पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 28/02/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बेला :– पो.स्टे. बेला दिनांक 10/02/2016 चे 01.58 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अप. क्र. 24/2016 कलम 354 (अ) (1) भादवी सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 09/02/2016 चे 20.15 वा. ते 20.20 वा. दरम्यान 16 वर्षीय पिडीत/फिर्यादी मुलगी हिला आरोपी नामे – प्यारेलाल लिलाराम तागडे(शिक्षक), वय 47 वर्ष, रा. बेला याने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 10/02/2016 चे 15.33 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. जितेन्द्र आडोळे, पो.स्टे. बेला यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 28/02/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती इंगळे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 (अ)(1)(i)(ii) भादंवि. मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 5000/–रु. दंड व दंड न भरल्यास 3 महिण्याची साधी कैद, तसेच 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वय 3 वर्ष सश्रम कारावास व 5000/–रु. दंड व दंड न भरल्यास 3 महिण्याची कैदेची शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खाकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकर तराळे, श्री वासुदेव मस्के, भवानीप्रसाद मिश्रा, पोनाईक संजय मसराम यांनी मदत केली आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर पारडसिंगा येथे दिनांक 27/02/2020 चे 17:30 वा. दरम्यान गौरव देवीदास आंबले, वय 22 वर्ष, रा. पारडसिंगा याने अज्ञात कारणातुन राहत्या घरी घराचे आडयाला दाराने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देवीदास अजाबारव आंबले, वय 52 वर्ष, रा. पारडसिंगा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर